समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र. सविवि/११२५
दिनांक - १२/०७/२०१८

# कार्यालयीन परिपत्रक

पुणे महानगरपालिकेतील घाणभत्ता मिळणाऱ्या मागासवर्गीय सेवकांच्या माध्यमिक शाळेत जाणाऱ्या (इ. ८ वी ते १० वी) मुलांना शैक्षणिक अर्थसहाय्य देणेची व पुणे महानगरपालिका हद्दीतील कचरा वेचक व बायोगॅस प्रकल्पावर काम करणारे तसेच कचऱ्याच्या संबंधित काम करणाऱ्या सर्व असंघटीत कष्टकरी कामगारांच्या मुलांना शैक्षणिक साहित्यासाठी अर्थसहाय्य देणेची योजना आहे.

सदर योजनेमध्ये बसणाऱ्या व अटींची पुर्तता करणाऱ्या सेवकांनी/कामगारांनी dbt.puencorporation.org या संकेतस्थळावरती दि. १ ऑगस्ट २०१८ ते दि. १५ सप्टेंबर २०१८ पर्यंत अर्ज भरून कागदपत्रांसहित संबंधित क्षेत्रिय कार्यालयाच्या/घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या शिफारशीसह समाज विकास विभाग, मुख्य इमारत, तळमजला, पुणे महानगरपालिका येथे दि. २० सप्टेंबर २०१८ पर्यंत सादर करणेत यावेत.

अपूर्ण अर्ज व खातेप्रमुखाची स्वाक्षरी नसलेले अर्ज स्विकारले जाणार नाही.

कळावे.

१२/०७/१८

(संध्या गागरे)
**उप आयुक्त**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

**प्रत** – १. मा. सर्व खाते प्रमुख,
२. मा. सह महापालिका आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन,
३. मा. सह महापालिका आयुक्त (वि. का. २ व ४),
४. मा. उप आयुक्त (वि. का. १ व ३),
५. मा. प्रशासकीय अधिकारी, शिक्षण मंडळ,
६. मा. शिक्षणाधिकारी, माध्यमिक व तांत्रिक विभाग,
७. मा. सरव्यवस्थापक, मनपा वाहन व्यवहार,
८. मा. सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त,
पुणे महानगरपालिका
९. पुणे मनपा कामगार युनियन, पुणे

D:\NEW_UCD3\KARYALAY_PARIPATRAK_2010\Ghanbhatta Sevakanbabat.doc